जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

# महाराष्ट्राचा कौल : नवीन आव्हाने

संपादकीय

१५ ऑक्टोबरला झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजपची सरशी झाली असून हा अंक वाचकांच्या हाती पडेपर्यंत महाराष्ट्र भाजपचे विद्यमान अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांचा भाजपचा राज्यातील पहिला मुख्यमंत्री म्हणून शपथविधी पार पडलेला असेल. बहुकोनी झालेल्या या निवडणुकीत २७.८ टक्के मते मिळवून भाजपने ४२.४ टक्के जागा (१२२) जिंकल्या आहेत. २००९च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत, भाजपला तेव्हा मिळालेली १४ टक्के मते आता दुपटीने वाढली आहेत, आणि तेव्हा मिळालेल्या ४६ जागा अडीच पटीहून जास्त वाढल्या आहेत.

काँग्रेस वगळता, महाराष्ट्र विधानसभेत १००हून अधिक जागा जिंकणारा भाजप हा पहिला पक्ष ठरला आहे. १९७८ साली आणीबाणीविरोधी वातावरणात झालेल्या निवडणुकीतही जनता पक्षाला ९९ जागांवरच समाधान मानावे लागले होते.

तरीसुद्धा हरियाणात त्याच दिवशी झालेल्या निवडणुकीत भाजपने ९० पैकी ४७ जागा जिंकून जसे स्पष्ट बहुमत मिळविले, तसे बहुमत महाराष्ट्रात मिळविण्याचे भाजपचे स्वप्न पूर्ण झालेले नाही. बहुमतासाठी लागणाऱ्या २३ जागांची बेगमी कशी करायची यासाठी भाजपची धडपड सुरू आहे.

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीने ४८ पैकी ४२ जागा जिंकून २८८ पैकी २४४ विधानसभा क्षेत्रांत आघाडी घेतली होती. त्याऐवजी आता भाजप व सेना वेगवेगळे लढून त्यांनी १८६ जागा जिंकल्या आहेत. म्हणजेच ५८ जागांची घट झाली आहे. पण मतांमध्ये फारशी घट झालेली नाही. मोदी प्रभाव थोडा कमी झाला असला (मोदींनी महाराष्ट्रात ज्या २७ जागांवर जाहीर सभा घेतल्या त्यांपैकी १७ जागांवर भाजपचा पराभव झाला) तरी तो पूर्णत: ओसरलेला नाही. मीडिया जाहिरातींवर भाजपने जेवढा खर्च केला, तेवढा इतर सर्व भांडवली पक्षांनी मिळून सुद्धा कदाचित केला नसावा. या निवडणुकीत भाजपचा मुख्य जनाधार शहरी व निमशहरी भागात, मध्यमवर्गात, उच्च जातीत व ओबीसीत आणि विशेषत: तरुणांत लक्षणीय प्रमाणात दिसला. पण मराठा, दलित व आदिवासी समाजातील मतेही तो आकर्षित करू शकला.

६३ जागा आणि १९.३ टक्के मते मिळवून शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. निवडणूक प्रचारात नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना अफझल खानाची उपमा दिल्यानंतर आता शिवसेनेच्या नेत्यांनी सत्तेचा चतकोर मिळविण्यासाठी मवाळ हळवे सूर आळवण्यास सुरुवात केली आहे. तथाकथित 'मराठी बाणा' आता गेला कोठे, असा प्रश्न अनेक शिवसैनिकच विचारू लागले आहेत.

लोकसभा निवडणुकीतील यशानंतरच खरंतर भाजपने महाराष्ट्राची निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला होता. शिवसेनेसोबतच्या अखेरच्या क्षणापर्यंतच्या वाटाघाटी म्हणजे निव्वळ फार्स होता. पण या खेळीत भाजपचा सुरुवातीपासूनच राष्ट्रवादी काँग्रेस सोबत समझोता झाला असावा. म्हणूनच २५ सप्टेंबरला युती तुटल्याचे भाजपने जाहीर केल्याच्या तासाभरातच आघाडी तुटल्याचे राष्ट्रवादीने जाहीर केले! इतकेच नव्हे, तर १९ ऑक्टोबरला या निवडणुकीचे निकाल पूर्णत: जाहीर होत नाहीत तोच राष्ट्रवादीने भाजपच्या संभाव्य सरकारला बिनशर्त पाठिंबा देण्याचे जाहीर करून शिवसेनेची पुरती कोंडी करून ठेवली!

या खेळीमागे राष्ट्रवादीने जाहीर केल्याप्रमाणे 'महाराष्ट्राचे हित' वगैरे काहीही नसून, भ्रष्टाचाराचे आरोप असलेले प्रफुल पटेल, अजित पवार, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांना वाचविण्यासाठी केंद्रात व राज्यात सत्ताधारी झालेल्या भाजपसमोर लाचार लोटांगण घालण्याचा हा प्रकार आहे. आजच्याच 'लोकसत्ते'च्या पहिल्या पानावर 'गेली शान तरी आलिशान!' या बातमीत भुजबळ कुटुंबियांच्या मुंबईतील नवीन नऊ मजली आलिशान महालाच्या वैभवाचे वर्णन छापून आले आहे.

गेली १५ वर्षे महाराष्ट्रावर सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला हादरा बसणार हे सुरुवातीपासूनच स्पष्ट होते. आणि नेमके तसेच झाले. काँग्रेसला ४२ जागा आणि १८ टक्के मते,

तर राष्ट्रवादीला ४१ जागा आणि १७.२ टक्के मते, अशी तिसऱ्या क्रमांकासाठी झालेली चुरशीची लढाई काँग्रेसने थोडक्यात जिंकली. जनविरोधी धोरणांचा सुळसुळाट, 'आदर्श'पासून ते 'सिंचना'पर्यंत भ्रष्टाचाराचा कळस आणि विक्रमी स्तरापर्यंतची अंतर्गत साठमारी ही त्यांच्या दारुण पराभवाची तीन मुख्य कारणे होती. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आपल्या स्वच्छ प्रतिमेचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला खरा, पण निर्णयच न घेणारा एक अकार्यक्षम मुख्यमंत्री अशीच त्यांची प्रतिमा राज्यभरात गेली.

या निवडणुकीत मतदारांनी मनसेला आपली जागा दाखवून १३ जागांवरून १ जागेवर आणून ठेवले, ही स्वागतार्ह घटना आहे. पण दुसरीकडे एमआयएम या मुस्लीम मूलतत्त्ववादी पक्षाचा या निवडणुकीत महाराष्ट्रात पडलेला प्रभाव ही चिंताजनक बाब आहे. मुंबई व औरंगाबाद या दोन जागांवर झालेला तिचा विजय, आणि सोलापूर व अन्य काही मतदारसंघांत दुसऱ्या क्रमांकाची तिला मिळालेली मते हा भाजपच्या उदयाचा आणि काँग्रेस, राष्ट्रवादी व समाजवादी पक्षांच्या दांभिकपणाचा एकत्रित परिणाम आहे. काही ठिकाणी मुस्लिम आणि दलित अशा दोन्ही समाजांची बरीच मते एमआयएमने घेतली आहेत.

या निवडणुकीत पैसा, जात आणि धर्म यांचा प्रभाव प्रचंड वाढल्याचे दिसून आले. चारही प्रमुख भांडवली पक्षांनी पाण्यासारखा पैसा ओतला आणि जात व धर्माचा सर्रास वापर केला. आमूलाग्र निवडणूक सुधारणा केल्याशिवाय यास आळा घालणे शक्य नाही.

महाराष्ट्रात डाव्या व लोकशाही पक्षांची 'महाराष्ट्र लोकशाही समिती' उभारण्याचा प्रयत्न अखेरच्या क्षणी झाला. पण जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरील सातत्याच्या संघर्षातून उभारलेल्या आघाड्याच जनतेत विश्वासार्हता कमावू शकतात हाच आजवरचा देशभरातील अनुभव आहे. महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षांची डाव्या व लोकशाही पक्षांची ती मोठी कमजोरी राहिलेली आहे. तसेच त्यापैकी काही पक्षांचा राजकीय संधीसाधूपणाही भोवला आहे. या समितीचे ५ आमदार परवाच्या निवडणुकीत निवडून आले - शेकापचे ३, माकपचा १ आणि भारिप-बहुजन महासंघाचा १.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या निवडणुकीत २० जागा लढवल्या आणि सर्व जागांवर पक्षाने जोशपूर्ण मोहीम राबविली. नाशिक जिल्ह्यात कळवण (अज) जागेवर पक्षाचे राज्य सचिवमंडळ सदस्य आणि किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष जीवा पांडू गावीत यांचा अत्यंत प्रेरणादायक विजय झाला. त्याबद्दल त्यांचे, पक्षाच्या नाशिक जिल्हा कमिटीचे, सुरगाणा व कळवण तालुका कमिट्यांचे आणि या निवडणुकीत विजयासाठी अहोरात्र राबणाऱ्या पक्ष व जनसंघटनांच्या हजारो कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहोत! येत्या आठवड्यात होणाऱ्या पक्षाच्या राज्य कमिटी बैठकीत पक्षाच्या निवडणूक कामगिरीची सविस्तर चर्चा होऊन योग्य ते निष्कर्ष काढले जातील आणि पुढील कार्ये ठरविली जातील.

भाजपसारखा एक साम्राज्यवादधार्जिणा, नवउदारवादी धोरणे घेणारा, अंबानी-अदानी आणि टाटा-बिर्लासारख्या कॉर्पोरेट जगताचा भरघोस पाठिंबा असणारा, फॅसिस्ट विचारसरणीच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेला धर्मांध पक्ष भारतात स्वबळावर प्रथमच सत्तास्थानी आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत महाराष्ट्रात प्रथमच सत्तास्थानावर येणे हे मराठी जनतेसमोर आणि डाव्या धर्मनिरपेक्ष शक्तींसमोर एक गंभीर आव्हान आहे. ७ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हे आव्हान वैचारिक, राजकीय, संघर्षात्मक आणि संघटनात्मकरीत्या पेलण्याचा वज्रनिर्धार आपण सर्व जण करू यात तिळमात्र शंका नाही.

□□□

## पक्षाच्या राज्य कमिटीची बैठक

## बेलापूर : दि.४-५ नोव्हेंबर २०१४

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य सचिवमंडळाची बैठक सोमवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता जनशक्ती, वरळी, मुंबई येथे होईल आणि पक्षाच्या राज्य कमिटीची बैठक मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे भरेल व ती बुधवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी संपेल.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा आढावा आणि आगामी पक्ष अधिवेशने हे या बैठकीचे दोन प्रमुख विषय असतील. पक्षाचे पॉलिटब्यूरो सदस्य खासदार सीताराम येचुरी व केंद्रीय सचिवमंडळ सदस्य माजी खासदार निलोत्पल बसू हजर राहतील. तरी सर्व सदस्यांनी वेळेवर हजर राहावे.

– डॉ. अशोक ढवळे, राज्य सेक्रेटरी

## महाराष्ट्र राज्य किसान कौन्सिल बैठक

## बेलापूर : दि. ६ नोव्हेंबर २०१४

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बुधवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वाजता आणि राज्य किसान कौन्सिलची बैठक गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे भरेल. या दोन्ही बैठकींसाठी संबंधित कार्यकर्त्यांनी अवश्य हजर राहावे.

| | | |
|---|---|---|
| दादा रायपुरे | अर्जुन आडे | किसन गुजर |
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सरचिटणीस |

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष

**प्रकाश करात**

## १

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष त्याच्या स्थापनेचा सुवर्णमहोत्सव या वर्षी साजरा करत आहे. पक्षाची स्थापना ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर, १९६४च्या दरम्यान कोलकत्त्याला झालेल्या ७व्या पक्ष काँग्रेसमध्ये झाली. नंतरच्या काळात अनेक अडचणी आणि संकटांशी सामना करत पक्षाची वाढ झाली आहे. पक्ष आणि चळवळीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हजारो कॉम्रेड्सनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. त्यांच्या स्मृतींना आम्ही वंदन करत आहोत.



भारतातल्या कम्युनिस्ट आंदोलनात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. पक्षाची स्थापना विजनवासातील भारतीय कम्युनिस्टांच्या एका गटाने ऑक्टोबर १९२० मध्ये ताश्कंद येथे केली. त्याला लगेच कम्युनिस्ट इंटरनॅशनलने मान्यताही दिली. नंतरच्या काळात १९२०च्या दशकात देशाच्या विविध भागांत हळू हळू, छोटे छोटे कम्युनिस्ट गट स्थापन होऊन कार्यरत होऊ लागले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष एक संघटित अखिल भारतीय पक्ष म्हणून काम करू लागला तो १९३४ मध्ये मीरत येथे खटल्यातील कैद्यांची सुटका झाल्यानंतर.

स्वातंत्र्यानंतर भारतातील क्रांतीची रणनीती कशी असावी या मुद्यावर झालेल्या प्रदीर्घ पक्षांतर्गत संघर्षातून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा जन्म झाला. जवळ जवळ दहा वर्षे, हा संघर्ष संयुक्त पक्षात सुरू होता आणि त्या कारणानेच पक्षाला आपला कार्यक्रम स्वीकारता आला नाही.

१९६४ मध्ये राष्ट्रीय कौन्सिलच्या बैठकीतून ३२ सदस्यांनी सभात्याग केला आणि पक्ष फुटला. ही फूट सोव्हिएत-चीन यांच्यातील दुहीमुळे झाल्याची सर्वदूर भावना त्यावेळी पसरली होती. तत्कालीन काँग्रेस सरकारनेदेखील मार्क्सवादी कम्युनिस्टांची 'पेकिंगवादी' बंडखोर म्हणून संभावना केली. असा गैरसमज होण्याला त्या काळची ऐतिहासिक पार्श्वभूमी कारणीभूत ठरली.चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन जगभरातील अनेक देशांतील कित्येक गट अस्तित्वातील कम्युनिस्ट पक्षांच्या बाहेर पडले होते. यातील बहुतेक कम्युनिस्ट गट लहान लहान पक्ष आणि मूळ पक्षाच्या छाया या स्वरूपातच राहिले आणि स्वतंत्र राजकीय प्रभाव वा जनतेत पाया निर्माण करू शकले नाहीत.

पण भारतातील चित्र वेगळे होते. सोव्हिएत युनियनचा कम्युनिस्ट पक्ष आणि चीनचा कम्युनिस्ट पक्ष यांच्यातील वाढती दरी आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षातील फूट या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्या हे खरे. पण भारतातल्या पक्षातील फुटीचे कारण ते नव्हते. भारतीय शासनसंस्थेचे आणि सत्ताधारी वर्गांचे स्वरूप काय आहे, यासारखे प्रश्न आणि पक्षाने क्रांतीसाठी काय कार्यक्रम स्वीकारावा याविषयी पक्षांतर्गत प्रदीर्घ संघर्ष चालू होता. याची परिणती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेत झाली. ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६४ मध्ये झालेल्या ७व्या काँग्रेसमध्ये 'पक्ष कार्यक्रम' स्वीकारून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यक्रमातून भारतीय समाजाचे आणि त्यातील वर्गांचे मार्क्सवादी-लेनिनवादी विश्लेषण करून भारतीय क्रांतीची रणनीती पहिल्यांदाच ठरवण्यात आली. कार्यक्रमाने भारतीय शासनसंस्थेचे स्वरूप स्वच्छपणे दाखवून दिले. बड्या भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखालील भांडवलदार-जमीनदार वर्गांनी चालवलेले शासन असे तिचे स्वरूप असल्याचे नि:संदिग्धपणे दाखवून देण्यात आले. विद्यमान रणनीती ठरवण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेला हा घटक निश्चित केल्यामुळे त्याभोवतालचे गोंधळाचे आवरण दूर झाले.

पक्ष कार्यक्रमाच्या द्वारे क्रांतीचा टप्पा, शासनसंस्थेचे स्वरूप आणि जनता लोकशाही क्रांतीसाठी आवश्यक असलेली वर्गीय एकजूट सुनिश्चित करण्यात आली, त्या दिशेने व्यवहार सुरू झाला आणि पक्ष कार्यक्रमातील सूत्रे काळाच्या कसोटीला उतरली. हा कार्यक्रम २००० मध्ये अद्ययावत करण्यात आला. तथापि, वर उल्लेख केलेले रणनीतीचे मुख्य घटक कायम आहेत. गेल्या पन्नास वर्षात पक्षाच्या राजकीय, संघटनात्मक आणि वैचारिक कृतींना मार्गदर्शन करत आला आहे, तो हा कार्यक्रमच.

या कार्यक्रमामुळेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष भारतातील आघाडीचा डावा पक्ष बनला आहे. पक्षाचे दहा लाखाहून अधिक सभासद असून ते काम करत असलेल्या जनसंघटनांची एकूण सभासद संख्या आहे ७ कोटी.

## २

पक्षाची स्थापना झाल्यानंतर लगेचच पक्षाने आपली वैचारिक भूमिका ठरवली. १९६० पासून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत गंभीर वैचारिक मतभेद आणि संघर्ष सुरू झाले होते. नव्या कालखंडाचा आशय, त्यातील प्रमुख अंतर्विरोध, दोन सामाजिक व्यवस्थांचे शांततापूर्ण सहअस्तित्व आणि समाजवादाकडे शांततापूर्ण संक्रमण या सर्वच प्रश्नांवर तीव्र मतभेद निर्माण होऊन सोव्हिएत आणि चीनचा कम्युनिस्ट पक्ष दोन परस्परविरोधी गटांत विभागले होते. ७व्या पक्ष काँग्रेसनंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जवळ

जवळ संपूर्ण नेतृत्वालाच तुरुंगात डांबण्यात आले होते. या कारणाने पक्षाला विविध वैचारिक प्रश्नांवर आपली भूमिका १९६८ पर्यंत स्पष्ट करता आली नव्हती. परिणामी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष चिनी कम्युनिस्ट पक्षाची री ओढतो, असा गैरसमज काही विभागात पसरला होता. याविषयीची वैचारिक भूमिका स्पष्ट करण्यात झालेल्या विलंबामुळे देशातील कम्युनिस्ट चळवळीत डावा साहसवादी पंथ उदयाला आला आणि पक्षाचे नुकसान झाले.

या पार्श्वभूमीवर बरद्वान येथे १९६८ मध्ये प्लीनम घेऊन पक्षांतर्गत चर्चेतून वैचारिक भूमिका स्वीकारण्यात आली. बरद्वान प्लीनममध्ये भारतीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीतील उजवा दुरुस्तीवाद आणि डावा साहसवाद यांच्याशी ऐतिहासिक फारकत घेण्यात आली. सोव्हिएत आणि चिनी या दोन्ही कम्युनिस्ट पक्षांच्या कित्येक सैद्धांतिक भूमिकांवर टीका करून आपल्या स्वतंत्र वृत्तीचे जिवंत दर्शन पक्षाने दिले.

यातून पक्षाचे खास वैशिष्ट्य दिसून येते. संयुक्त भारतीय कम्युनिस्ट पक्ष बाल्यावस्थेत असताना सिद्धांत आणि व्यवहारासाठी सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षावर विसंबून असे. (स्वातंत्र्यपूर्व काळात हे काम कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या निर्देशाने ग्रेट ब्रिटनच्या कम्युनिस्ट पक्षामार्फत होत असे.) हाच वारसा स्वातंत्र्यानंतरही चालूच राहिला. त्यानंतर डाव्या साहसवादी प्रवृत्तीला साठीच्या दशकात चीनच्या कम्युनिस्ट पक्षाकडून खतपाणी मिळाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने हे ‘अवलंबित्व’ मोडून काढले. कार्यक्रम, त्यातून निर्माण होणारे डावपेच आणि स्वीकारण्यात आलेल्या वैचारिक भूमिका या सर्व बाबतीत भूतकाळातील व्यवहारापासून द्वंद्वात्मक रीतीने फारकत घेण्यात आली.

या सर्वंकष फारकतीचा पाया होता भारताच्या ठोस परिस्थितीचे मार्क्सवादी-लेनिनवादी विश्लेषण करण्याचा प्रयत्न. याचा अर्थ होता, ‘शहाणपण’ उसनवारीने न घेता, इतर देशात यशस्वी झालेल्या क्रांत्यांचे मॉडेल यांत्रिकपणे भारतात न अवलंबता आपला स्वत:चा मार्ग निवडण्याचे धाडस दाखवणे. हे धाडस मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने दाखवले.

सोव्हिएत युनियनच्या पतनाचे जगभरच्या कम्युनिस्ट पक्षांवर आणि समाजवादी उद्दिष्टांवर फार घातक परिणाम झाले. भारतातल्या कम्युनिस्ट चळवळीवर देखील तो परिणाम झाला. तथापि या घडामोडींचा राजकीय-वैचारिक आणि संघटनात्मक बाबतीत सर्वात कमी परिणाम झाला तो मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षावर. जगभरच्या कम्युनिस्ट पक्षांचे चित्र पहाता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची ही कामगिरी जास्तच ठळकपणे जाणवते. याचे कारण म्हणजे पक्षाचे मार्क्सवादाविषयीचे स्वतंत्र आकलन.

पक्षाने सोव्हिएतविरोधी भूमिका न घेता सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या विचार व व्यवहाराविषयी सातत्याने टीकात्मक भूमिका स्वीकारली होती. सोव्हिएत युनियन वा सोव्हिएत पक्षावर अंधविश्वास ठेवला नसल्याने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर उद्भवलेल्या परिस्थितीला जास्त चांगल्या रीतीने तोंड देऊ शकला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तुलनेने कमी नुकसान झाले. भारतातील कष्टकऱ्यांत आणि मार्क्सवाद-लेनिनवादात वैचारिक मुळे सखोल आणि घट्ट रुजलेली असल्याकारणाने २०व्या शतकात समाजवादाची उभारणी करण्याच्या अनुभवातून पक्ष स्वत: सैद्धांतिक आणि व्यावहारिक निष्कर्ष काढू शकला. त्या आधारेच तो २१व्या शतकातील नवोन्मेषशालीन समाजवाद प्रत्यक्षात आणण्यासाठी धीरोदात्तपणे पावले टाकत आहे. १९९१ नंतरच्या दहा वर्षात पक्षाच्या सदस्यसंख्येत सातत्याने वाढच झालेली आहे, हे या आत्मविश्वासाचेच द्योतक आहे.

## ३

शेतकी-क्रांती हा लोकशाही क्रांतीचा गाभा आहे, असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कार्यक्रम सांगतो. त्यामुळे शेती आणि जमीन यांच्या प्रश्नांना पक्षाच्या व्यवहारात मध्यवर्ती स्थान राहिलेले आहे.

स्थापनेपासूनच जमिनीचा संघर्ष पुढे नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा आघाडीवरचा पक्ष आहे. जमीनदारीविरुद्ध, बेनामी जमिनी ताब्यात घ्याव्यात, सिलिंगच्या मर्यादेबाहेरील जादा जमिनींचे वाटप करावे, शेतमजुरांना घरांसाठी पट्टे द्यावेत आदि प्रश्नांवर केलेल्या संघर्षातून प. बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यांत डाव्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या सरकारांनीच केवळ भूमिसुधारणा अर्थपूर्ण रीतीने राबवल्या. त्या सरकारांनीच शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणावर पुनर्वाटप केले आणि कुळांना आणि बटाईदारांना संरक्षण दिले.

या प्रश्नांवर विशेषत: १९६० आणि १९७०च्या दशकात संघर्षाच्या लाटांवर लाटा उसळल्या. हाच संघर्ष १९६७ ते १९७० या काळातील प. बंगाल आणि केरळमधील संयुक्त आघाडीच्या सरकारांच्या पाठीशी होता. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष त्याचे नेतृत्व करत होता.

कामगारवर्गाचा पक्ष म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सतत कामगारवर्गाची चळवळ बळकट करणे आणि लोकशाही आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी कामगारवर्ग सक्षम व्हावा यासाठी त्याला राजकीय शक्ती म्हणून संघटित करत आला आहे. खासगीकरण, कामाचे कंत्राटीकरण यांच्या विरोधात आणि ट्रेड युनियन हक्कांच्या संरक्षणासाठी पक्ष लढत आला आहे.

वर्गीय शोषण आणि सामाजिक अन्याय-अत्याचार हे सध्याच्या भांडवली-जमीनदारी व्यवस्थेचे दोन खांब आहेत असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष मानतो. त्यामुळे पक्ष महिला, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्य यांच्यावरील सर्व प्रकारच्या सामाजिक अन्याय-अत्याचारांच्या विरुद्ध लढत आला आहे.

## ४

जेव्हा जेव्हा आपल्या हिंतसंबंधांना गरज असते तेव्हा तेव्हा देशातील सत्ताधारी वर्ग लोकशाहीवर हल्ले करतात, लोकशाहीचा संकोच करतात, त्यामुळे लोकशाही, लोकशाही हक्क आणि अगदी घटनेने दिलेले मर्यादित अधिकारदेखील सुरक्षित रहात नाहीत अशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची मूलभूत धारणा आहे. देशात एकपक्षीय एकाधिकारशाहीचा धोका असल्याची पूर्वसूचना देणारा पहिला पक्ष होता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष. १९७२ मध्ये झालेल्या ९व्या पक्ष काँग्रेसमध्ये अशी धोक्याची सूचना पक्षाने दिली होती प. बंगालमधील अनुभवाच्या आधारे. तेथे १९७१ पासून निमफॅसिस्ट दहशतीची राजवट होती आणि तिला शासनसंस्थेचे आणि इंदिरा गांधी सरकारचे पाठबळ होते.

या निमफॅसिस्ट दहशतवादाची परिणती झाली जून १९७५ मध्ये देशावर लादण्यात आलेल्या आणीबाणीत. या सर्व कालखंडात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष लोकशाही आणि लोकशाही हक्कांच्या संरक्षणार्थ झालेल्या लढाईत अग्रभागी राहिला. पक्ष आणीबाणीविरुद्ध लढला. या काळात त्याचे शेकडो नेते आणि कार्यकर्ते यांना तुरुंगात डांबण्यात आले. लोकशाहीवरील हा हल्ला परतवून लावण्यासाठी पक्षाने इतर लोकशाहीवादी शक्तींशी आघाडी केली. त्यामुळेच आणीबाणी उठताच पक्षाला मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. प. बंगालमधील निमफॅसिस्ट दहशतवादाविरुद्ध आणि देश

पातळीवरील आणीबाणीविरुद्ध लढ्यात पक्षाने मोलाची कामगिरी केल्याने १९७७च्या प. बंगाल विधानसभा निवडणुकीत पक्ष आणि डावी आघाडी प्रथमच सत्तेवर आली, तीही २/३ बहुमताने.

लोकशाही आणि लोकशाही हक्कांवरील हल्ल्यांची धार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डाव्या शक्ती यांच्या विरोधात जास्तच तीव्र असते. प. बंगालमधील दहशतवादी निमफॅसिस्ट हल्ल्यांच्या पाठोपाठ त्रिपुरात १९८८ ते १९९३च्या दरम्यान दहशतवादाने थैमान घातले. प. बंगालमध्ये पुन्हा २०११ पासून सर्वदूर अशा दहशतीचा आणि लोकशाही हक्कांच्या पायमल्लीचा अनुभव येऊ लागला आहे. लोकशाही हक्क आणि लाल बावटा यांचे संरक्षण करता करता शेकडो कॉम्रेडनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे.

## ५

संसदीय लोकशाही व्यवस्थेत काम करण्याचा समृद्ध अनुभव भारतातील कम्युनिस्ट चळवळीला आहे. स्वत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. पक्ष स्थापनेनंतर राज्य सरकारांत व संसदीय व्यासपीठांवर कसे कामकाज करावे, याविषयी पक्षाने सृजनशील भूमिका पार पाडली. याविषयीच्या डावपेचांसाठी मार्गदर्शन पक्षाच्या कार्यक्रमातच सामावलेले आहे. १९५७ मध्ये केरळमध्ये स्थापन झालेल्या पहिल्या कम्युनिस्ट सरकारच्या अनुभवाचाही त्याला फायदा झाला. विधीमंडळात डाव्या आणि लोकशाही शक्ती बळकट असतील तरच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष राज्य सरकारमध्ये सहभागी होतो. जनतेच्या लोकशाही आणि सामुदायिक चळवळी पुढे नेण्यासाठी आणि जनतेला भांडवली-जमीनदारी व्यवस्थेत शक्य होतील त्या सुविधा देण्याच्या उद्दिष्टानेच पक्ष सरकारमध्ये सहभागी होतो. १९६७-७०च्या दरम्यानच्या कालखंडात प. बंगाल आणि केरळमध्ये संयुक्त आघाडीची सरकारे स्थापन करून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने हे डावपेच कार्यवाहीत आणले.

१९७७ नंतर प. बंगाल, केरळ आणि त्रिपुरा येथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या सरकारांनी (राज्य शासनांना असलेल्या मर्यादांचे भान ओळखून) भांडवली-जमीनदारी धोरणांना पर्याय देण्यासाठी होत असलेल्या लढ्यांत महत्त्वाची भूमिका बजावली.

भूमिसुधारणा, सत्तेचे विकेंद्रीकरण, सामुदायिक कृती करण्याच्या कष्टकऱ्यांच्या हक्कांना बळकटी, धर्मनिरपेक्षतेचे संरक्षण या क्षेत्रात सरकारांनी बजावलेल्या कामगिरीमुळे डाव्या आणि लोकशाही कार्यक्रमपत्रिकेचा विकास होण्यास मदत झाली आहे.

## ६

याला आवश्यक असे राजकीय व्यासपीठ म्हणजे संघराज्य असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष मानतो. भारत हा एक बहुराष्ट्रीय देश आहे, असे पक्ष मानतो. आर्थिक आणि सामाजिक विकासात सर्व भाषिक गटांना योग्य हिस्सा मिळेल अशी हमी देणारे संघराज्यच देशाची एकता अबाधित ठेवू शकते.त्यामुळे देशात संघराज्यीय राजकीय व्यवस्था आवश्यक आहे.

देशातील संघराज्यात्मक व्यवस्था राखण्यासाठी आणि प्रादेशिक आणि वांशिक दुरभिमान जोपासणाऱ्या शक्तींशी दोन हात करत जनतेची एकजूट राखण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सतत झगडत आला आहे. १९८०च्या दशकात देशात विविध ठिकाणी फुटीर शक्ती कार्यरत असताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या प्रश्नावर आपल्या भूमिकेशी ठाम राहिला आणि पंजाब, आसाम, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीर येथे शेकडो कॉम्रेडनी जनतेची एकजूट राखण्यासाठी फुटीर शक्तींशी लढत आपल्या प्राणांची आहुती दिली. केंद्र-राज्य संबंधांची पुनर्रचना करण्याच्या प्रश्नावर पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हीच भूमिका डाव्यांच्या नेतृत्वाखालील सरकारांनी अधोरेखित केली आहे. १९८३ मध्ये श्रीनगर येथे १५ पक्षांची केंद्र-राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नांवर एक परिषद झाली होती. त्यात पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## ७

जमातवादाच्या विरोधात सर्वात सातत्यपूर्ण आणि खंबीर भूमिका घेतली आहे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने. जमातवादाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. ब्रिटिशांच्या विरोधात चाललेल्या लढाईत फूट पाडण्यासाठी धार्मिक जमातवादाचा उपयोग करून घेण्यात आला होता. फाळणीच्या वेळी पसरलेल्या हिंसक थैमानात कम्युनिस्टांनी दाखवलेले शौर्य अपूर्व आणि डोळे दिपवणारे होते. संख्येने थोडे असले तरी कम्युनिस्ट हिंसक लाटांच्या विरोधात पाय रोवून उभे राहिले आणि जमावांच्या हल्ल्यातून कित्येकांना त्यांनी सुखरूपपणे वाचवले. भारत स्वतंत्र झाल्यावरही ज्यांना ज्यांना हिंसेचे बळी व्हावे लागले त्या सर्वांना संरक्षण देण्याचे काम कम्युनिस्ट करत आले आहेत. १९६८ मध्ये केरळमधील थलासेरी येथे मशिदीवर चालून आलेल्या जमावाला रोखण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या यु. के. कुन्हीरामन या नेत्याने आपल्या प्राणांचे बलिदान दिले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे बिनतडजोड पालन करतो. धर्माची शासन आणि राजकारण यांच्यापासून पूर्ण फारकत म्हणजे धर्मनिरपेक्षता असे पक्ष मानतो. या उलट भांडवलदार-जमीनदार वर्गांचे पक्ष बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक जमातवाद्यांचे तुष्टीकरण करत असतात. कोणत्याही जमातवादी शक्तीने राजकारणात हस्तक्षेप करण्याला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कडवा विरोध आहे.

१९८०च्या दशकात भाजप-रा.स्व. संघाच्या रूपाने जमातवादाचा धोका निर्माण होत असल्याचा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने दिला होता. हिंदुत्ववादी शक्तींशी लढत त्यांना राजकीय दृष्ट्या अलग पाडण्यासाठी पक्ष सातत्याने प्रयत्न करत आला आहे. भाजपची शक्ती वाढणे, तो पक्ष सत्तेवर येणे या गोष्टी बड्या भांडवलदारांच्या आणि कॉर्पोरेट कंपन्यांच्या हिताच्याच आहेत. भाजप नवउदारवादी अजेंडा राबवायला बांधलेला आहे. म्हणूनच नवउदार धोरणे आणि बहुसंख्याक जमातवाद या दोन्हींविरुद्धचा लढा एकमेकांशी जोडलेला आहे, असे पक्ष मानतो. देशातील सर्व राजकीय पक्ष पहाता केवळ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डावे पक्ष यांनीच आजवर भाजप आणि जमातवादी शक्तींशी निवडणुकीतील वा राजकीय लाभासाठी कधीही तडजोड केलेली नाही.

## ८

गेल्या पन्नास वर्षात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ही राजकीय दृष्ट्या भारताला विकासाचा पर्यायी रस्ता दाखवणारी शक्ती बनलेली आहे. हा विकासाचा मार्ग सामाजिक-आर्थिक न्यायाची प्रस्थापना करणारा असून राजकीय लोकशाही जोपासणारा आहे. या कालखंडात भारतीय राजकारणात वेळोवेळी धर्मनिरपेक्षता, लोकशाही, संघराज्य व्यवस्था, सामाजिक आणि आर्थिक न्याय हे प्रश्न महत्त्वाचे बनत आले आहेत. या सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने स्वत:चे खास योगदान दिले आहे.

***(पान १४ पहा)***

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची ५० वर्षे : समाजवाद हेच भवितव्य!

सीताराम येचुरी



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीच्या सत्तेचाळीसाव्या वाढदिवशी झाली. ७ नोव्हेंबर १९६४ रोजी ७व्या काँग्रेसमध्ये क्रांतिकारी कार्यक्रम स्वीकारून ही स्थापना करण्यात आली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना ताश्कंद येथे १७ ऑक्टोबर १९२० रोजी झाली असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष मानत आला आहे. याउलट भारतीय कम्युनिस्ट पक्ष मात्र पक्षाची स्थापना २८ ते ३० डिसेंबर १९२५ या काळात कानपूर येथे भारतातील वेगवेगळ्या कम्युनिस्ट गटांनी एकत्र घेतलेल्या बैठकीत झाली असे मानत आला आहे. कानपूर येथील बैठकीच्या अध्यक्षस्थानी मद्रास प्रेसिडेन्सीचे कम्युनिस्ट नेते सिंगारावेलू चेट्टियार हे होते. तथापि आधीच देशाच्या विविध भागात वेगवेगळे कम्युनिस्ट गट कार्यरत नसते तर ही बैठक होऊ शकली नसती. तसेच १९२१ मध्ये अहमदाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सभेत मौलाना हसरत मोहानी आणि स्वामी कुमारानंद यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला होता. गांधीजींनी हा ठराव स्वीकारला नाही ही गोष्ट वेगळी. शेवटी अ.भा. काँग्रेस कमिटीने संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली ती ३१ डिसेंबर १९२९च्या लाहोर सभेमध्ये. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने हा ठराव १९२१ मध्येच मांडण्यात आला होता; यावरून पक्षाची स्थापना आधीच झाली होती असे दिसून येते. त्यामुळेच १९६४ मध्ये भारतातील क्रांतिकारी चळवळीचा वारसा सांगताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ती काँग्रेस पहिली नसून ७वी असल्याचे सांगितले. ७व्या काँग्रेसमध्ये भारतातील कम्युनिस्ट चळवळीतील क्रांतीच्या शिलेदारांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या उजव्या दुरुस्तीवादी आणि वर्गसमन्वयवादी भूमिकेशी फारकत घेतली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष हे अशा रीतीने भारतातील कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेचे ९४वे वर्ष देखील आहे.

जानेवारी १९८२ मध्ये झालेल्या माकपच्या ११व्या काँग्रेसच्या राजकीय-संघटनात्मक अहवालात म्हटले आहे, ''१९५५ ते १९६२ या काळात योग्य राजकीय-वैचारिक धोरण घेण्यावरून भारतीय कम्युनिस्ट पक्षात झालेल्या अंतर्गत संघर्षाची परिणती पक्ष फुटण्यात होऊन माकपची स्थापना झाली. या फुटीला राजकीय, वैचारिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील तीव्र मतभेद कारणीभूत होते....भारतीय शासनसंस्था आणि सरकार यांच्या वर्गीय स्वरूपाबद्दल दोन भिन्न मते मांडण्यात आली. त्यातून दोन परस्परविरोधी कार्यक्रम स्वीकारले जाऊन नंतरच्या कालखंडात परस्परांहून भिन्न राजकीय डावपेच व धोरण स्वीकारले गेले.''

माकपच्या ७व्या काँग्रेसच्या विसाव्या स्थापनादिनी कॉ. बी.टी. रणदिवे यांनी **'पीपल्स डेमॉक्रसी'**मध्ये (७ नोव्हेंबर १९८४) एक विशेष लेख लिहिला होता. त्यात कॉ. रणदिवे म्हणतात, ''खरा मुद्दा नव्या भारतीय शासनसंस्थेच्या आणि सरकारच्या वर्गीय स्वरूपाच्या मूल्यमापनाचा आणि त्यातून क्रांतीमध्ये कामगारवर्गावर येऊन पडणाऱ्या जबाबदारीचा होता. माकपने शासनसंस्थेचे वर्गीय स्वरूप हे 'परकीय वित्त भांडवलाशी वाढते संधान साधणाऱ्या बड्या भांडवलदारवर्गाच्या नेतृत्वाखालील भांडवली जमीनदारी शासन' असे असल्याचे म्हटले होते. याचा अर्थ सरकार आणि शासनसंस्थेचे बिनतडजोड सत्तासंघर्ष छेडणे, जनतेची लोकशाही राबविणारी शासनसंस्था स्थापणे असा होता. त्यामुळेच सरकारची दडपशाही, पश्चिम बंगालमधील निम फॅसिस्ट दहशत, केरळ आणि आंध्रप्रदेशातील खुनाचे सत्र या सर्व हल्ल्यांना न डगमगता माकप सातत्यपूर्ण संघर्ष करत आला आहे. जनतेच्या चळवळींवरील दडपशाहीला तोंड देत असताना माकपने मोठी किंमत मोजून या कालखंडात संघर्षाची मशाल तेवत ठेवली आहे. कधीकधी तर इतर डावे पक्ष साथ सोडून गेल्यानंतरही एकट्यानेच आपली वाटचाल चालू ठेवली आहे.''

भारतीय शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा समज काय होता? त्याच्या मते शासनसंस्थेचे नेतृत्व बडा आणि बडा नसलेला भांडवलदारवर्ग एकत्र करत होता. आणि प्रत्यक्षात शासनाचे आणि सरकारचे नेतृत्व बिगर बडा भांडवलदार करत असल्याची मांडणी आणि व्यवहार तो पक्ष करत होता.

दोन्ही पक्षांच्या समजेत क्रांतीच्या लोकशाही टप्प्यांविषयी मतभेद नसले तरी शासनसंस्थेचे वर्गीय स्वरूप, भारतीय भांडवलदारांचे दुहेरी स्वरूप आणि राजकीय धोरण याबाबतीत मात्र दोन्ही पक्षांत तीव्र मतभेद होते. या वर्षी या सर्व प्रश्नांविषयी खूप लिहिले जाईल. आधीच लिहूनही आले आहे. मी मात्र केवळ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वैचारिक पायाविषयी माझी काही मते मांडणार आहे.

याच प्रश्नांविषयी चर्चा करताना वर उल्लेख केलेल्या आपल्या तीस वर्षांपूर्वीच्या लेखात कॉ. बी. टी. रणदिवे म्हणतात, ''कम्युनिस्ट चळवळींमधली निरर्थक फूट हा गुन्हाच असतो. योग्य धोरणाला विरोध

करणारे लोकांपासून अलग पडतात. आणि शेवटी एक राजकीय शक्ती म्हणून नष्ट होतात. तसेच पक्षावर प्रभाव गाजविणारे नेतृत्व चुकीचे धोरण घेत असेल, बदल नाकारत असेल आणि पक्षाला वर्गसमन्वयाकडे घेऊन जात असेल तर संघर्ष आणि फूट होणारच. त्याचे दुष्परिणाम व्यवहारात दिसू लागले आहेत.''

सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या २०व्या काँग्रेसमध्ये स्वीकारलेल्या धोरणाचे फारच घातक परिणाम झाले. माकपची स्थापना होत असताना आणि नंतर १९६८ मध्ये बरद्वानला झालेल्या प्लीनममध्ये पक्षाने आपली वैचारिक भूमिका मांडली होती. सोव्हिएत पक्षाच्या २०व्या काँग्रेसने दुरुस्तीवाद आणि वर्गसमन्वय यांच्या अत्यंत विकृत रूपांना दारे सताड उघडल्याबद्दल माकपने कडक टीका केली होती. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत आलेल्या या उजव्या विकृतींवर बोट ठेवीत माकपच्या केंद्रीय समितीने (मे २८-३१, १९९०) ठरावात म्हटले आहे, ''(जगभरातले) कित्येक कम्युनिस्ट पक्ष अक्षरशः नष्ट झाले. इजिप्त, सुदान, इराकसारख्या विकसनशील देशांतील कम्युनिस्ट चळवळींवर दुरुस्तीवादाचे आघात झाले आणि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ दुर्बल झाली. इंडोनेशियामध्ये अत्यंत सशक्त असलेला कम्युनिस्ट पक्ष अत्यंत हिंसक रितीने नष्ट करण्यात आला. हा अनुभव ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.''

या पार्श्वभूमीवर भारतात दुरुस्तीवादाविरुद्ध झालेल्या संघर्षाने मोठी कामगिरी पार पाडली आहे असे दिसून येते. भारतातील कम्युनिस्ट चळवळ नष्ट झाली नाही याचे एक कारण आहे हा संघर्ष. या संघर्षामुळे भारतीय कम्युनिस्ट चळवळीतील क्रांतिकारी आशय टिकला आणि तो पुढे गेला तो भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या अंतर्गत झालेल्या वैचारिक संघर्षामुळे, दुरुस्तीवाद आणि वर्गसमन्वय जोपासणारी धोरणे नाकारल्यामुळे, भारतीय कम्युनिस्ट पक्ष फुटून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केल्यामुळे.

भारत आणि तिसऱ्या जगातील कम्युनिस्ट चळवळ दुरुस्तीवादाने पूर्णतः विकलांग केली आणि त्याचे योग्य निदान माकपने केले हे खरे. तरी देखील पक्षाने दुरुस्तीवादाचा प्रभाव कमी लेखला अशी आत्मटीका २८-३१ मे १९९० दरम्यान झालेल्या केंद्रीय समितीच्या ठरावात आणि नंतर जानेवारी १९९२ मध्ये झालेल्या १४व्या पक्ष काँग्रेसमध्ये केली आहे. ''दुरुस्तीवादी आणि पोथीनिष्ठ विकृतींमुळे काही डावपेच स्वीकारण्यात आले आणि त्याचा अनिष्ट परिणाम आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाच्या ताकदीवर झाला, वर्गसंघर्षाची धार बोथट झाली...सर्व जगभर चाललेल्या वर्गसंघर्षाबाबत हे खरे होतेच; **परंतु समाजवादी देशातील जनतेच्या सामुदायिक जाणिवेवर देखील त्याचा विपरीत परिणाम झाला.''** समाजवादी जगात नंतर जी पिछेहाट झाली त्याला समाजवादी समाजातील जाणिवेची ही दुर्गती हे एक महत्वाचे कारण ठरले असा निष्कर्ष माकपने काढला होता. १४व्या काँग्रेसमध्ये सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोप येथे समाजवादाचे पतन का झाले, याचे मूल्यमापन करणारा ठराव केला त्या ठरावाला वरील समज आधारभूत होता.

आपल्या देशातील कम्युनिस्ट चळवळीत एक डावी साहसवादी विकृतीही जन्माला आली. तिच्याशी संघर्ष करत पक्ष मजबूत झाला, त्याची वैचारिक मुळे घट्ट रुजली आणि देशातील क्रांतिकारी चळवळ मार्क्सवाद-लेनिनवादाच्या शास्त्रीय आणि योग्य पायावर उभी करण्याचा प्रयत्न केला.

सोव्हिएत युनियन भारतातील दुरुस्तीवादाचे समर्थन करत होता आणि चीनने नक्षलवादी विकृतीला काही वर्षे खतपाणी घातले होते. माकपने या दोन्ही विकृतींच्या विरोधात तीव्र वैचारिक संघर्ष केला तरी देखील सोव्हिएत युनियन आणि चीन या दोन्ही देशांना 'बिगरसमाजवादी' असे पक्षाने कधी संबोधले नाही. त्याचबरोबर या दोन्ही सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षांवर स्पष्ट आणि योग्य टीका देखील केली. या कम्युनिस्ट पक्षांनी घेतलेली मार्क्सवाद-लेनिनवादापासून फारकत आणि समाजवाद बांधण्याच्या प्रक्रियेतील त्यांनी केलेल्या गंभीर चुका यावर माकपने बोट ठेवले. त्यामुळे तब्बल २५ वर्षे माकपला आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीपासून 'अलग' पडावे लागले.

या संदर्भात एक प्रसंग आठवतो. १९६४ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या ७व्या काँग्रेससाठी जगातील कम्युनिस्ट पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ७०व्या काँग्रेससाठी मात्र एकदेखील नव्हता. त्यावेळी पत्रकारांनी ई.एम.एस. नंबुद्रीपाद यांना विचारले होते, 'माकपला कुणाचा पाठिंबा आहे?' आपल्या खास शैलीत त्यांनी उत्तर दिले, 'भारतीय जनतेचा!'

मार्क्सवाद-लेनिनवादाच्या क्रांतिकारी आशयावर असलेल्या कष्टकरी जनतेतील आपल्या सततच्या कामामुळे माकप ही भारतातील आघाडीची डावी शक्ती म्हणून उभी राहिली आहे. देशांतर्गत आणीबाणीचा पराभव, माकपचा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावरील उदय आणि प. बंगाल, केरळ व त्रिपुरात पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारे स्थापन झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट आंदोलनातील विविध घटकांनी माकपशी नव्याने संबंध प्रस्थापित करायला सुरुवात केली. सोव्हिएत युनियन आणि इतर देशांतील कम्युनिस्ट समारंभांना आणि इतर प्रसंगी माकपला बोलावले जाऊ लागले ते १९८०चे दशक उजाडल्यानंतर आणि चीनच्या कम्युनिस्ट पक्षाशी संबंध नव्याने प्रस्थापित झाले ते १९८३ मध्ये त्या पक्षाने पुढाकार घेतल्यावर.

या काळात आलेल्या अनुभवावरून काय निष्कर्ष काढायचा? प्रत्येक देशातील ठोस परिस्थितीचे योग्य असे मार्क्सवादी-लेनिनवादी विश्लेषण करून त्यावर आधारित योग्य डावपेचात्मक धोरण आखण्यावरच कोणताही कम्युनिस्ट पक्ष कसोटीला उतरतो. आणि हे केव्हा साध्य होते? पक्ष आपल्या वैचारिक भूमिकेशी घट्ट बांधील राहिला, ती बांधिलकी सखोल करत राहिला आणि आपल्या देशातील शोषित जनतेशी जिवाभावाचे नाते जोडत राहिला तरच. पक्षाचा सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना संपूर्ण पक्षाने ध्यानात ठेवायचे आहे, ते हे.

## जगातील सामाजिक अंतर्विरोध

चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने सुरूवातीला सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील दुरुस्तीवादाच्या विरोधात योग्य भूमिका घेतली होती. पुढे चीनच्या पक्षातच एक पोथीनिष्ठ एकांगी विकृती निर्माण झाली. त्यातून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ पार दुभंगून गेली. हे मतभेद संपुष्टात आणायचे प्रयत्न झाले. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून १९५७ मध्ये काही कम्युनिस्ट पक्ष एकत्र आले. त्याचे फलित म्हणून पुढे १९६० साली ८१ कम्युनिस्ट पक्षांची एक परिषद झाली. १९६०च्या परिषदेने जागतिक भांडवलशाहीच्या बदलत्या परिस्थितीला जुळवून घेण्याच्या आणि अरिष्टावर तात्पुरती मात करण्याच्या क्षमतेला कमी लेखले होते. भांडवली जग समाजवादी देशांच्या विरोधात जोरदार प्रतिक्रांतिकारक आघाडी उघडू शकते, ही शक्यता ती परिषद ओळखू शकली नाही. आपणही त्या परिषदेत

सहभागी असल्याने त्या चुकीची जबाबदारी आपल्या शिरावरही होती. माकपच्या १४व्या काँग्रेसमध्ये आपण ही चूक दुरुस्त केली. तथापि, जागतिक विजय संपादन करण्याकडे समाजवादी देशांची आगेकूच चालू आहे हे आपले पूर्वीचे मूल्यमापन मात्र फारच अतिशयोक्त होते.

ते काही असले तरी १९६०च्या परिषदेत जगातील मूलभूत सामाजिक अंतर्विरोधांविषयी प्रसृत करण्यात आलेले निवेदन बरोबर होते आणि १४व्या काँग्रेसमध्ये आपण ती भूमिका पूर्णत: स्वीकारली. जगातील भांडवलशाहीकडून समाजवादाकडे संक्रमण होण्याच्या युगात कोणत्याही क्षणी जगभर अनेकविध अंतर्विरोध असू शकतात. तथापि जागतिक घडामोडी खऱ्या अर्थाने आजच्या चार मूलभूत अंतर्विरोधांच्या प्रकाशातच समजून घेता येतात.

हे चार अंतर्विरोध असे: १. जागतिक समाजवाद आणि साम्राज्यवाद यांच्यातील अंतर्विरोध. २. साम्राज्यवाद आणि विकसनशील जगातील जनता यांच्यातील अंतर्विरोध. ३. साम्राज्यवादी जगातल्या देशांमधील अंतर्विरोध, आणि ४. भांडवली देशातील भांडवल आणि श्रम यांच्यातील अंतर्विरोध.

या चार अंतर्विरोधांपैकी जागतिक स्तरावर साम्राज्यवाद आणि समाजवाद यांच्यातील अंतर्विरोध केंद्रस्थानी आहे असे माकप मानतो. हा अंतर्विरोध केंद्रस्थानी राहूनच इतर कोणताही अंतर्विरोध एखाद्या वेळी तीव्र होऊ शकतो असेही माकप मानतो.

आपले हे आकलन खूप महत्वाचे आहे. भांडवलशाहीतून समाजवादाकडे होणाऱ्या संक्रमणाच्या युगात या चारही अंतर्विरोधांना मूलभूत महत्व आहे. यातील केंद्रस्थानी आहे तो साम्राज्यवाद आणि समाजवाद यांच्यातील अंतर्विरोध. परंतु सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर वर्गशक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीच्या बाजूने झुकले आहे. तरीही हा साम्राज्यवाद आणि समाजवाद यांच्यातील अंतर्विरोध केंद्रस्थानीच आहे. या चार अंतर्विरोधांपैकी कोणताही एक एखाद्या बिंदूवर जास्त महत्वाचा ठरू शकतो. व्हिएतनाममधील अमेरिकन आक्रमणाच्या वेळी साम्राज्यशाही आणि तिसरे जग यांच्यातील अंतर्विरोध महत्वाचा होता. याचा अर्थ त्या अंतर्विरोधाची उकल कशी होते यावर भविष्यातील जागतिक घडामोडी अवलंबून होत्या. अमेरिकन साम्राज्यशाहीच्या पराभवाने याची उकल समाजवादाच्या बाजूने झाली. आज हे चारही अंतर्विरोध तीव्र होत असले तरी साम्राज्यशाहीच्या पोटातील अंतर्विरोधाची धार तुलनेने कमी तीव्र आहे. उद्या जर अमेरिकेने समाजवादी क्युबावर लष्करी आक्रमण केले तर मात्र केंद्रीय अंतर्विरोधाला जास्त महत्व येईल.

अंतर्विरोधाचे हे सूत्र माकपचे मार्गदर्शक सूत्र आहे. १९६८, १९९२,२०१२ मधील वैचारिक ठराव आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीविषयी विविध पक्ष काँग्रेसमध्ये केलेले राजकीय ठराव यांच्यामागे ही वैचारिक भूमिका आहे.

हे सध्याच्या जागतिक परिस्थितीचे विश्लेषण नाही. पक्ष काँग्रेसच्या ठरावात ते केले जाईल. जगातील सामाजिक अंतर्विरोधांचे चुकीचे आकलन झाल्यास आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत गंभीर दोष निर्माण होतील एवढाच इशारा देण्याचा इथे हेतू आहे.

एके काळी अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्यात पराकोटीची शस्त्रास्त्र स्पर्धा होती. युद्ध आणि शांतता याद्वारे समाजवाद आणि साम्राज्यवाद यांच्यातील केंद्रीय अंतर्विरोध व्यक्त होतो. असे या काळात सोव्हिएत कम्युनिस्ट पक्ष मानत असे. त्यांच्या दृष्टीने जगातला हाच मुख्य अंतर्विरोध बनला होता. साहजिकच अमेरिकन साम्राज्यशाहीच्या युद्धप्रयत्नांना विरोध करणाऱ्या विविध राजकीय शक्ती कम्युनिस्ट पक्षांच्या मित्रस्थानी आहेत असे मानले जाऊ लागले. याच्या परिणामी भारतात भाकपने आपला वर्गसमन्वयाचा कार्यक्रम पुढे रेटत जागतिक शांततेच्या नावाने काँग्रेसला पाठिंबा दिला. त्यावेळी भारतातील जनता सत्ताधारी वर्गांच्या विरुद्ध जोरदार संघर्ष करत होती. भाकपच्या या धोरणाने तो संघर्ष बोथट करायचा प्रयत्न केला. त्याचीच परिणती भाकपने पुढे आणीबाणीला पाठिंबा देण्यासारख्या अनेक गोष्टीत झाली. भाकपने ही चूक पुढे आणीबाणी संपल्यानंतर भटिंडा काँग्रेसमध्ये दुरुस्त केली.

याचवेळी दुसरीकडे कम्युनिस्ट चळवळीत साहसवादाने शिरकाव केला. त्यावेळी अमेरिकेने व्हिएतनामवर आक्रमण केले होते. त्या युद्धाच्या रूपाने मुख्य बनलेल्या साम्राज्यवाद आणि समाजवाद यांच्यातील अंतर्विरोधाला साहसवादी विचारसरणीने केंद्रस्थान दिले. या डाव्या साहसवादी प्रवृत्तीने समाजवादी सोव्हिएत युनियनची 'सामाजिक साम्राज्यवादी' म्हणून संभावना केली. आपल्या देशांतर्गत सत्ताधारी वर्गांना साम्राज्यशाहीचे 'दलाल' म्हटले. म्हणजे या वर्गांना जनतेत पायाच नाही असा समज करून घेतला. यामधून परिस्थिती आता क्रांतियोग्य झाली आहे, जनता मोठ्या प्रमाणावर सत्ताधारी वर्गांच्या विरोधात उभी आहे आणि आता गरज आहे ती फक्त लोकांच्या सशस्त्र उठावाची, अशी समजूत करून घेतली. या समजुतीमुळे अनेक देशांत 'लोकयुद्धाची' घोषणा देण्यात आली. भारतात ही भूमिका सुरुवातीला नक्षलवाद्यांनी आणि आता माओवाद्यांनी स्वीकारली आहे. या विकृतीचे भारतीय कम्युनिस्ट चळवळीवर किती घातक परिणाम झाले आहेत हे सर्वज्ञात आहे.

दोन्ही विकृतींनी एक अत्यंत महत्वाची गोष्ट नजरेआड केली: **भारतातील वर्गशक्तींचे संतुलन आपल्या बाजूने वळवल्यानंतर सध्याचे सत्ताधारी वर्ग खाली खेचणे शक्य आहे.**

सोव्हिएत युनियन आणि चीनने भारतीय कम्युनिस्ट चळवळीत हस्तक्षेप करून तिचे नुकसान केले. तरीही माकपने त्यांना 'बिगरसमाजवादी' म्हटले नाही. जगातल्या या महाकाय पक्षांना त्यांच्या चुकांबद्दल त्यांना खडसावण्यासदेखील मागे पुढे पाहिले नाही. माकपने आपल्या देशात क्रांती करण्यासाठी नेहमीच मार्क्सवाद-लेनिनवाद उराशी बाळगला आहे.

भारतात क्रांतीसाठी वस्तुनिष्ठ परिस्थिती कितीही तयार झाली तरीही एका घटकाची आवश्यकता आहे. तो म्हणजे क्रांतीचा आत्मनिष्ठ घटक. क्रांतीचा आत्मनिष्ठ घटक बळकट होण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक, कामगारवर्गाचा वैचारिक संघर्ष आणि दोन, मार्क्सवाद-लेनिनवाद स्वीकारलेल्या पक्षाच्या नेतृत्वाखाली निर्णायक हस्तक्षेप. या दोन मार्गांनी भारतातील जनतेच्या सर्व शोषित विभागांना संघटित करून सध्याचे वर्गीय संतुलन बदलले पाहिजे. त्या आधारावरच जनतेच्या लोकशाहीची आणि पुढे समाजवादाची स्थापना करता येईल.

हा आत्मनिष्ठ घटक बळकट करण्यासाठी विसाव्या पक्ष काँग्रेसने आपल्या वैचारिक ठरावात आठ सूचना केलेल्या होत्या.

१. परस्परांना पूरक पद्धतीने संसदीय आणि बिगर संसदीय संघर्ष उभा राहणे.

*(पान १४ पहा)*

# महाराष्ट्रातील कम्युनिस्ट चळवळीची गौरवशाली परंपरा

डॉ. अशोक ढवळे

महाराष्ट्र हे कम्युनिस्ट चळवळीची प्रदीर्घ आणि गौरवशाली परंपरा असलेले राज्य आहे. त्याला ब्रिटिश साम्राज्यवाद्यांशी स्वातंत्र्यासाठी केलेल्या संग्रामाचा वैभवशाली वारसा आहे. या लढाईत कित्येक कम्युनिस्टांनी आणि त्यांच्या नेतृत्वाखाली कामगार आणि शेतकऱ्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे.




ही परंपरा सुरू होते १९२०च्या दशकात. मुंबईच्या गिरणी कामगारांनी सुप्रसिद्ध अशा गिरणी कामगार युनियनचा लाल झेंडा हातात घेऊन प्रचंड लढे केले. मोठमोठे संप केले. गिरणी कामगार युनियनचे नेतृत्व करत होता कम्युनिस्ट पक्ष. यात संस्मरणीय ठरला तो सहा महिने चाललेला १९२८चा ऐतिहासिक संप. त्यावेळच्या भांडवलदारवर्गाशी कामगारवर्गाने छेडलेला वर्गसंघर्ष. मुंबईच्या कामगारवर्गाने या संघर्षातून अनेक हक्क कमावले. कामगार लढ्याच्या पहिल्या पिढीचे नेते होते बी. टी. रणदिवे, श्रीपाद अमृत डांगे, एस. एस. मिरजकर आदि. मुंबईतल्या कामगारांच्या संघर्षाचा वणवा झपाट्याने सोलापूर, ठाणे, धुळे, जळगाव, नागपूर इत्यादी जिल्ह्यांत पसरला.

कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील कामगारांच्या या लढाईची दोन वैशिष्ट्ये होती. ती आजही आपल्याला स्फूर्ती देतात. पहिले वैशिष्ट्य म्हणजे कम्युनिस्ट नेत्यांनी कामगारांना ब्रिटिशांच्या विरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात मोठ्या संख्येने उतरवले. दुसरे म्हणजे या कामगारवर्गाला त्यांनी धर्मनिरपेक्ष बनवले; प्रतिगामी, जमातवादी शक्तींच्या विरोधात लढायचे संस्कार केले.

सोलापूरचे कामगार आणि तेथील जनता १९३० मध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड करून उठली. ब्रिटिश सत्ता उलथून त्यांनी सोलापूर शहराचे प्रशासन काही दिवस आपल्या ताब्यात घेतले. हा लढा 'सोलापूर कम्यून' म्हणून प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्याचे हे बंड मोडून ब्रिटिशांनी शहरावर अत्यंत जुलमी असा मार्शल लॉ लावला. भयानक दडपशाही केली. १२ जानेवारी १९३१ रोजी मल्लाप्पा धनशेट्टी, किसन सारडा, कुर्बान हुसेन आणि जगन्नाथ शिंदे या उठावाच्या नेत्यांना ब्रिटिश सरकारने फासावर चढवले.

या घटनेला तीन महिने झाले नसतील, तोच ब्रिटिशांनी २३ मार्च १९३१ ला तीन हुतात्म्यांना फाशी दिली. ते अजरामर हुतात्मे होते भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव. यापैकी राजगुरू होते पुणे जिल्ह्यातल्या खेडचे शिवराम हरी राजगुरू. हेच खेड पुढे राजगुरूनगर झाले.

१९३८ मध्ये सरकारने कामगारवर्गाविरुद्ध काळा कायदा लावला. या कायद्याच्या विरोधात कम्युनिस्ट पक्ष आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष एकत्र आले आणि त्यांनी प्रचंड लढा उभारला. यशस्वी संप केला. डॉ. आंबेडकरांच्या सुरुवातीच्या चळवळीत आर. बी. मोरे आणि शामराव परुळेकर हे प्रमुख नेते सामील झाले होते. ते दोघेही पुढे कम्युनिस्ट बनले. १९२७ साली महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे आर. बी. मोरे एक प्रमुख संघटक होते. उच्चवर्णियांसोबत दलितांनाही त्या तळ्याचे पाणी घेण्याचा हक्क असला पाहिजे, या मागणीसाठी तो सत्याग्रह करण्यात आला होता.

१९३८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शामराव परुळेकरांच्या नेतृत्वाखाली कोकणातील खोती जमीनदारी पद्धतीविरुद्ध विधानभवनावर शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा काढण्यात आला. त्यासाठी कोकणातील हजारो शेतकरी बोटींनी मुंबईला आले होते.

कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली नव्हती तेव्हापासून महाराष्ट्रात जमीनदारीविरुद्ध शेतकरी आणि आदिवासींचे मोठमोठे लढे झाले होते. महात्मा फुल्यांनी जमीनदारी आणि जातीय अत्याचार व विषमता यावर कडक टीका करणारे लिखाण केले होते. यातून शेतकऱ्यांना लढायची प्रेरणा मिळाली. सावकारांच्या विरुद्ध १८७५ मध्ये शेतकऱ्यांनी केलेला प्रचंड उठाव इतिहासात 'डेक्कन रायट्स' म्हणून नोंदवलेला आहे.

शेतकऱ्यांची संघटित चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली ती कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली किसान सभेची स्थापना झाल्यापासून. महाराष्ट्र राज्य

किसान सभेची पहिली परिषद ठाणे जिल्ह्यातील टिटवाळ्याला १२ जानेवारी १९४५ ला भरली. महाराष्ट्रातील किसान सभेचे अध्वर्यू होते शामराव आणि गोदावरी परुळेकर.

इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिलेले कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासींचे बंड सुरू झाले ते किसान सभेच्या ह्या परिषदेतून स्फूर्ती घेऊनच. मे १९४५ मध्ये ठिणगी पडलेल्या या बंडाचा वणवा सर्व आदिवासी भागात दोन वर्षात पसरला. या वणव्यात सर्व प्रकारची वेठबिगारी आणि गुलामगिरी जळून राख झाली. शेतमजुरांची मजुरी वाढली. कसणाऱ्या आदिवासींना काही प्रमाणात जमीन मिळाली.

या लढ्याचे प्रत्ययकारी चित्रण गोदूताईंच्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या सुप्रसिद्ध पुस्तकात आले आहे. शामराव परुळेकरांनीही 'वारल्यांचे बंड' नावाचे पुस्तक लिहिले आहे. आदिवासींच्या या बंडात पहिले पाच हुतात्मे धारातीर्थी पडले १० ऑक्टोबर १९४५ रोजी. ३०,०००हून अधिक आदिवासी ठाणे जिल्ह्यातील तलवाड्याला (आता गुजरातमध्ये गेलेले गाव) जमले होते. त्या शांतपणे जमलेल्या जनसागरावर सावकार आणि जमीनदारांच्या बाजूने ब्रिटिश सरकारने निर्घृणपणे गोळ्यांचा वर्षाव केला. कॉ. जेठ्या गांगडसह पाच आदिवासी हुतात्मे झाले.

१९४३ मध्ये आणखी एक अभूतपूर्व संगर सुरू झाले. १९४३ ते १९४६ या काळात साडेतीन वर्षे सातारा-सांगली जिल्ह्यांतून ब्रिटिशांची सत्ता तेथील जनतेने उलथून टाकली होती. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखालील प्रति-सरकारला (पत्री सरकार) शेतकरी आणि सामान्य जनतेने मोठे पाठबळ दिले होते. नाना पाटील पुढे कम्युनिस्ट पक्षात सामील झाले आणि मे १९५५ मध्ये ठाणे जिल्ह्यात डहाणू येथे भरलेल्या अखिल भारतीय किसान सभेच्या १३व्या परिषदेत त्यांची किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली.

ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी राजवटीच्या शवपेटीवर शेवटचा खिळा ठोकला तो मुंबईच्या नाविकांनी. १९४६च्या फेब्रुवारीत नाविक बंड करून उठले आणि त्यांच्या बंडाचा वणवा हां हां म्हणता भारतातल्या सर्व बंदरांवर पसरला. नौदलाच्या या बंडाला पाठिंबा द्यायला कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग या दोन्ही प्रमुख पक्षांनी नकार दिला. तेव्हा नाविकांनी कम्युनिस्ट पक्षाकडे मदत मागितली. कम्युनिस्ट पक्षाने तात्काळ त्यांना मदतीचा कृतिशील हात दिलाच. शिवाय, त्यांच्या पाठिंब्यासाठी हजारो गिरणी कामगारांना रस्त्यावर उतरवले. या लढाऊ कामगारांनी आपल्या प्राणांची बाजी लावून ब्रिटिश फौजेशी मुंबईच्या रस्त्या-रस्त्यावर निकराची लढाई केली. ब्रिटिश रणगाड्यांना संचार करता येऊ नये म्हणून मोठमोठे अडथळे उभे केले. बी. टी. रणदिवे यांनी त्या मंतरलेल्या पाच दिवसांचे रोमहर्षक वर्णन त्यांच्या नाविकांच्या बंडावरील पुस्तिकेत केले आहे. १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यानच्या त्या पाच दिवसांत ब्रिटिशांनी ४०० कामगारांचा बळी घेतला. ठार झालेल्यात कॉ. कमल दोंदे होत्या. कमलताईंच्या सोबत असलेल्या अहिल्याताई रांगणेकर योगायोगाने वाचल्या. अहिल्याताईंच्या भगिनी कुसुम रणदिवे यांच्या पायात गोळी घुसली.

स्वातंत्र्यानंतर देशात ठिकठिकाणी भाषावार प्रांतरचना व्हावी यासाठी लोकशाही आंदोलने उभी राहिली. कॉंग्रेसने स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी जनतेला भाषावार प्रांतरचना करण्याचे आश्वासन दिले होते. स्वातंत्र्यानंतर सत्तेवर आल्यावर मात्र त्या पक्षाने स्वत:च्याच आश्वासनाला हरताळ फासला. १९५० नंतर हळूहळू विशाल आंध्र, ऐक्य केरळम्, संयुक्त महाराष्ट्र, महा गुजरात या चळवळी सुरू झाल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९५५ ते १९६०च्या दरम्यान शिगेला पोहोचली. तिचे नेतृत्व केले होते कम्युनिस्ट, प्रजा समाजवादी, शेतकरी कामगार आणि रिपब्लिकन पक्षांनी. या आंदोलनाच्या ज्वालांनी सारा महाराष्ट्र बघता बघता व्यापून गेला.

कॉंग्रेस सरकारने ब्रिटिशांना लाजवेल अशी राक्षसी दडपशाही केली. पोलीस गोळीबारात १०६ हुतात्मे झाले. त्यातील बहुसंख्य मुंबईतील कामगार होते. या आंदोलनामुळे १९५७च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला जबर धक्का बसला. संयुक्त महाराष्ट्र समितीतील चारही पक्षांचे कित्येक महत्त्वाचे नेते खासदार व आमदार म्हणून निवडून आले. शेवटी केंद्र सरकारला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करावीच लागली. 'समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र' ही आंदोलनाची घोषणा घराघरात चैतन्य पेरत होती. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र स्थापन झाला. मे दिन महाराष्ट्र दिनही झाला.

'कसेल त्याची जमीन, पण नसेल त्याचे काय?' हा मार्मिक प्रश्न विचारून पन्नाशी व साठीच्या दशकात कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्ष आणि क्रांतिसिंह नाना पाटील तसेच शामराव व गोदावरी परुळेकर यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट पक्ष यांचे निळे व लाल झेंडे एकत्र आले आणि महाराष्ट्रभर हजारो शेतमजूर-शेतकऱ्यांनी जमिनीसाठी जबरदस्त सत्याग्रह व आंदोलने केली. हा एक ऐतिहासिक प्रसंग होता.

महाराष्ट्रातील कम्युनिस्ट पक्षात दुरुस्तीवादाविरुद्धचा संघर्ष विशेष तीव्र होता. कारण दुरुस्तीवादी प्रवाहाचे नेते स्वत: श्री. अ. डांगे हे महाराष्ट्रातील नेते होते. केंद्र सरकारने ७ नोव्हेंबर १९६२ ते ३० एप्रिल १९६६ अशी साडेतीन वर्षे पक्षाच्या महाराष्ट्रातील कित्येक नेत्यांना तुरुंगात डांबले. तलासरीला १९६४ मध्ये झालेल्या पक्षाच्या ७व्या राज्य परिषदेत एस. वाय. कोल्हटकर यांची माकपचे पहिले राज्य सचिव म्हणून निवड झाली. त्याच वर्षी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची ७वी कॉंग्रेस कलकत्त्याला झाली. पक्षाच्या पहिल्या पॉलिटब्यूरोत बी. टी. रणदिवे यांची आणि केंद्रीय समितीत एस. वाय. कोल्हटकर आणि शामराव परुळेकर यांची निवड झाली. तथापि, ३ ऑगस्ट १९६५ रोजी शामराव परुळेकरांचे हृदयविकाराने निधन झाले. हा पक्षाला बसलेला मोठा धक्का होता. त्यांच्या जागी पुढे गोदावरी परुळेकरांची केंद्रीय समितीत निवड झाली.

१९६६ मध्ये बड्या भांडवलदारांच्या पाठिंब्यावर आणि कॉंग्रेस सरकारच्या आशिर्वादाने शिवसेनेची स्थापना झाली. या निमफॅसिस्ट संघटनेशी कम्युनिस्टांना तेव्हापासून दोन हात करावे लागलेले आहेत. मुंबईतील कामगारांवर कम्युनिस्टांची असलेली पकड मोडून काढणे हाच खरा हेतू शिवसेनेच्या स्थापनेमागे आणि तिला बळकट करण्यामागे होता. कम्युनिस्टांचा कामगारवर्गावर किती प्रभाव होता, याचे प्रत्यंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून दिसून आले होते. शिवसेना मराठी अस्मितेचे राजकारण करत पुढे आली. प्रादेशिक आणि भाषिक दुरभिमान हा तिचा वैचारिक कणा होता. तिने आपल्या कामाची सुरुवात दक्षिण भारतीयांवर हल्ल्यांनी केली. तिने कम्युनिस्टांच्या मुंबईतील कार्यालयांवरदेखील हिंसक हल्ले चढवले. कम्युनिस्टांनी अर्थातच प्रतिकार केला. पण शिवसेनेच्या डोक्यावर कॉंग्रेसच्या राज्य सरकारचा आणि पोलिसांचा संपूर्ण वरदहस्त होता. या आशिर्वादाच्या जोरावरच शिवसेनेच्या गुंडांनी १९७० मध्ये भाकपचे आमदार कृष्णा देसाई यांचा खून केला.

प्रजा समाजवादी पक्ष हा संयुक्त महाराष्ट्र समितीतील एक प्रमुख घटक होता. त्या पक्षाने घेतलेल्या संधीसाधू भूमिकेमुळे या निमफॅसिस्ट हल्ल्याचा प्रतिकार करून कामगारवर्गीय चळवळीचे संरक्षण करणे अवघड झाले. १९६८च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत 'प्रसप'ने शिवसेनेशी निवडणूक आघाडी करून राजकीय जगताला जबर धक्का दिला. अर्थात, समाजवाद्यांच्या राजकीय संधीसाधूपणाचा हा होता ना पहिला प्रसंग, ना शेवटचा.

संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यशस्वी झाल्यानंतर काँग्रेसला आव्हान देण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिती एक राजकीय आघाडी म्हणून चालूच ठेवावी, असा प्रस्ताव कम्युनिस्ट पक्षाने दिला होता. प्रसपने हा प्रस्ताव तडक फेटाळून लावला. त्यामागे होती त्या पक्षाची कम्युनिस्टविरोधी भूमिका. ही भूमिका १९५७ मध्येच केरळमध्ये दिसून आली होती. ईएमएस नंबुद्रीपाद यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट सरकारच्या विरोधात काँग्रेसने छेडलेल्या तथाकथित 'मुक्तिलढ्यात' प्रसप बिनदिक्कतपणे सहभागी झाला होता. त्या आंदोलनाचे निमित्त करून केंद्रातील काँग्रेस सरकारने केरळच्या लोकांनी निवडून दिलेले कम्युनिस्ट सरकार १९५९ साली बरखास्त केले.

१९७५-१९७७ या १९ महिन्यांच्या काळात आणीबाणी विरुद्धच्या लढाईत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अग्रेसर राहिला. पक्षाच्या अनेक नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. कित्येकांना स्थानबद्ध करण्यात आले. दडपशाहीला न जुमानता पक्षाने लोकशाहीच्या पुनर्स्थापनेची लढाई जारीच ठेवली. याउलट भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आणीबाणीला पाठिंबा दिला.

१९७७च्या सार्वत्रिक निवडणुकीत एकाधिकारी काँग्रेसचा धुव्वा उडाला आणि स्थापन झालेल्या संयुक्त आघाडीतून पक्षाचे तीन उमेदवार- अहिल्याताई रांगणेकर (मुंबई), लहानू कोम (ठाणे जिल्हा) आणि गंगाधरअप्पा बुरांडे (बीड जिल्हा) लोकसभेवर निवडून गेले. त्या पाठोपाठ १९७८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकाधिकारशाही विरोधातील व्यासपीठातर्फे माकपचे ९ आमदार निवडून आले. आजवर महाराष्ट्रात सर्वात जास्त आमदारांची संख्या हीच राहिली आहे.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या रूपाने महाराष्ट्रात उभारलेल्या डाव्या व लोकशाही राजकीय प्रवाहाला आणीबाणीविरोधी संघर्षाने नवी ऊर्जा मिळाली. पण थोड्या अवधीतच समितीतला 'समाजवादी' घटक विलयाला जाऊ लागला. समाजवाद्यांनी आधीच एक राजकीय घोडचूक केली होती. त्यांनी १९७७ मध्ये रा. स्व. संघाच्या नेतृत्वात चालणाऱ्या भारतीय जनसंघाला जनता पक्षात सामावून घेतले होते. रिपब्लिकन पक्षाचे विभागही दिशाहीन होऊन काँग्रेस पक्षाचे शेपूट म्हणून रहाण्यात धन्यता मानू लागले होते. रिपब्लिकन पक्षाचा एक महत्त्वाचा घटक तर आता भाजप-शिवसेनेच्या महायुतीतच सहभागी झाल्याचे चित्र अगदी अलिकडचे आहे. आता ती महायुतीच तुटली असली तरी तो पक्ष भाजपशी सोयरिक करीत आहे. भारिप-बहुजन महासंघ आणि रिपब्लिकन सेना यांनी मात्र स्वतंत्र भूमिका घेतली आहे. राज्याच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्ष ही एके काळी महत्त्वाची शक्ती होती. तीही कमकुवत झाल्याचे दिसत आहे.

अनेक कारणांमुळे काँग्रेसच्या विरोधात असलेल्या धर्मनिरपेक्ष राजकीय प्रवाहावर विपरीत परिणाम झाला आहे. त्याची ताकद घटली आहे. माकपने आपल्या पारंपरिक क्षेत्रातील प्रभाव कायम राखण्याचा प्रयत्न करत पक्ष काही नव्या परिसरात आपला प्रभाव निर्माण करत आहे. आज वर्गसंघर्ष पुढे नेण्यासाठी माकपला मुख्यत: स्वत:च्याच शक्तीवर आणि त्याच्या सदस्यांच्या नेतृत्वाखालील वर्गीय व जनसंघटनांच्या आधारावर विसंबून रहावे लागत आहे, अशी राजकीय परिस्थिती आज महाराष्ट्रात आहे.

या राजकीय पार्श्वभूमीवर आणीबाणीनंतर लोकांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांवर माकपच्या नेतृत्वाखाली अनेक लढे राज्यभर लढवण्यात आले. अनेक राजकीय प्रश्नांवर व्यापक मोहिमा घेण्यात आल्या. या लढ्यांचा आणि मोहिमांचा तपशील देण्याची ही जागा नव्हे. तरीही अलिकडील काळातील दोन यशस्वी आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या लढ्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

त्यापैकी एक आहे २०००-०१ सालचा एन्रॉन या अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीच्या दाभोळ वीज प्रकल्पाविरुद्धचा संघर्ष. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या साऱ्याच पक्षांनी एन्रॉनसोबत भ्रष्ट तडजोड करून एन्रॉनला कायम १६% नफा मिळायची हमी दिली होती, हे सर्वश्रुत आहे. प्रकल्पातून वीज उत्पादित होऊ लागली आणि विजेचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले. एन्रॉनला महाकाय बिल द्यावे लागल्याने महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ दिवाळखोरीत निघण्याची परिस्थिती निर्माण झाली. २००१ मध्ये माकप, शेकाप, भाकप, जद(से) यांनी इतर डाव्या व लोकशाही पक्षांच्या साथीने राज्यभर प्रचंड आंदोलन केले आणि दाभोळ प्रकल्प सरकारला बंद करावा लागला. एन्रॉनला देशातून गाशा गुंडाळावा लागला. पण या चार प्रस्थापित पक्षांनी एन्रॉनसोबत केलेल्या गुन्हेगारी देवघेवीची किंमत अजूनही महाराष्ट्राला मोजावी लागत आहे. एन्रॉन जाऊन पंधरा वर्षे झाली तरी लोडशेडींग आणि दरवाढ हे रोजचेच मरण झाले आहे.

दुसरा संघर्ष होता शेकाप आणि माकपच्या नेतृत्वाखालील रायगड जिल्ह्यातील २००६-०९ दरम्यानचा सेझ विरोधी लढा. हा १०,००० हेक्टरचा महामुंबई सेझ विकसित करणार होती मुकेश अंबानींची रिलायन्स इंडस्ट्रीज. तीन तालुक्यांतील ५० गावांतील ५०,००० शेतकरी विस्थापित होणार होते. त्या प्रकल्पाच्या विरोधात ५० आणि ६० हजारांचे दोन अभूतपूर्व मोर्चे कोकण भवनावर काढले. लोकांनी या गावातील सर्व रस्ते बंद केले. त्यानंतर बाधित गावातील ९७% लोकांनी सार्वमतात जमिनीचा अंशही रिलायन्सला द्यायला नकार दिला. या अभूतपूर्व लढाईनंतर शासनाला हे सेझ रद्द करावे लागले. हा एक मोठा विजय होता.

महाराष्ट्र माकपने गेल्या काही वर्षात भाववाढ, अन्नसुरक्षा, दारिद्र्यरेषा, पेन्शन, भ्रष्टाचार, भारत-अमेरिका अणुकरार, जैतापूर येथील अणुप्रकल्प आदि प्रश्नांवर मोठमोठी राज्यव्यापी आंदोलने केली. महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त एक राज्यव्यापी मोहीम राबवली. दलित, स्त्रिया आणि अल्पसंख्य यांच्यावरील अत्याचारांच्या प्रसंगी हस्तक्षेप केला. या आंदोलनांत आणि मोहिमांत हजारो लोक सहभागी झाले. सोलापुरात पक्षाने विडी कामगार स्त्रियांसाठी १०,००० स्वस्त घरांची 'कॉम्रेड गोदुताई परुळेकर घरकुल योजना' नावाने एक नाविन्यपूर्ण योजना राबवली. आता तेथे इतर विभागांसाठी अशीच एक महत्त्वाकांक्षी योजना प्रस्तावित आहे. नाशिक जिल्ह्याच्या सुरगाणा तालुक्यात 'घरपोच धान्य योजना' पक्षाच्या पुढाकाराने सुरू झाली व ती राज्यभर पसरली.

या काळात पक्षाच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या विविध जनसंघटनाही कृतिशील राहिल्या. कामगारांचे दिल्लीला अनेक मोर्चे आणि देशव्यापी संप यशस्वी करण्यासाठी सीटूने सर्व कामगार संघटनांची एकजूट करण्यासाठी पुढाकार घेतला. असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटित करून त्यांच्या लढ्यांचे नेतृत्व केले. या लढ्यात हजारो कामगार सहभागी

झाले. वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अ.भा. किसान सभेने दोन राज्यव्यापी जेलभरो केले. या जेलभरोत १ लाख शेतकरी सहभागी झाले. शेतकरी आत्महत्या आणि शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नांवरही किसान सभेने आंदोलने केली. दारिद्र्यरेषेत समावेश व्हावा या मागणीसाठी १ लाख २५ हजार ग्रामीण गरिबांनी किसान सभेच्या नेतृत्वाखाली राज्यभर निदर्शने केली. नरेगा, घरे, रेशन अशा प्रश्नांवर शेतमजूर युनियनने अनेक आंदोलने केली. अन्नसुरक्षा आणि महिलांवरील अत्याचार, शिक्षण आणि रोजगार या प्रश्नांवर अनुक्रमे अ.भा. जनवादी महिला संघटना, एस.एफ.आय. आणि डी.वाय.एफ.आय. या संघटनांनी लढे उभारले. पक्षाच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयीन शिक्षकांनी विजय संपादन केले.

आज पक्षासमोर खूप मोठी राजकीय आव्हाने आहेत. केंद्रात भाजप सरकार नवउदार धोरणे राबवत आहे. महाराष्ट्रातही अशीच धोरणे भाजपच्या नेतृत्वाखाली स्थापन होणारे नवीन राज्य सरकार राबविणार आहे. या धोरणांपायी गरीब व श्रीमंत यांच्यातली दरी वाढत असून श्रमिक जनता दैन्याच्या डोंगराखाली पिचून जात आहे. भाजप आणि शिवसेना हे पक्ष हिंदुत्वाचे धर्मांध राजकारण करत आले आहेत, तर दुसरीकडे आता एमआयएम हा पक्ष मुस्लिम मूलतत्ववादी राजकारण पुढे नेत आहे. मनसे भाषिक आणि प्रांतिक दुरभिमान जोपासत हिंसक कृती करत आहे. उच्चपदस्थांचा प्रचंड भ्रष्टाचार हा राज्यातला एक ज्वलंत प्रश्न बनला आहे. राज्याच्या नैतिक नसा भ्रष्टाचाराने कुजत आहेत.

या लोकविरोधी शक्ती आणि त्यांची जनविरोधी धोरणे यांच्याविरुद्ध जनतेचे लढे उभारण्यास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष कटिबद्ध आहे. या लढ्यांत सहभागी होण्याचे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला करत आहे!

□□□

## (माकपचे सुवर्णमहोत्सवी वर्ष... पान ७ वरून)

अलिकडील निवडणुकांत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि इतर डाव्या पक्षांची गंभीर पीछेहाट झाली आहे. उजव्या शक्ती आक्रमक बनून भाजपचे कॉर्पोरेट हित जोपासणारे हिंदुत्ववादी सरकार सत्तेवर आले आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाही, कष्टकऱ्यांचे हक्क आणि पर्यायी धोरणे यांच्या संरक्षणासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डावे पक्ष बळकट होणे आवश्यक आहे. पक्ष गंभीरपणे हे आव्हान स्वीकारत आहे. एप्रिल २०१५ मध्ये पक्षाची २१वी काँग्रेस होत आहे. नव्या राजकीय परिस्थितीला परिणामकारकरित्या तोंड देण्यासाठी केंद्रीय समिती तयारी करत आहे. नवउदार भांडवलशाहीच्या वीस वर्षांहून अधिकच्या कालावधीत भारतीय समाज आणि वर्ग यांच्यात झालेल्या बदलांचा ठोस अभ्यास करत आहे. संघटनेला आणि जनतेत करावयाच्या कामाला २१वी पक्ष काँग्रेस एक नवी दिशा देईल.

आज भारत नवउदार धोरण राबवणाऱ्या भांडवलशाहीच्या कराल दाढात अडकला आहे. भांडवलशाहीचे हे जनावर आपल्या देशाचे रक्त शोषत आहे. आर्थिक आणि राजकीय विषमता कमालीची वाढली आहे. जगातील काही सर्वात श्रीमंत आणि संख्येने सर्वात जास्त गरीब भारतातच रहातात. समाजवादाकडे घेऊन जाणाऱ्या पर्यायी धोरणाचा संघर्ष हा अत्यंत अवघड आणि अथकपणे करावयाचा संघर्ष आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आपला सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना आपले ध्येय आत्मविश्वासाने आणि निर्धाराने गाठण्यासाठी नव्या जोमाने कंबर कसत आहे.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

## (समाजवाद हेच भवितव्य... पान १० वरून)

२. कामगार-शेतकरी एकजूट निर्माण करणे.
३. कामगारवर्गाची एकजूट बळकट करणे.
४. अस्मितेच्या नकारात्मक राजकारणाचा प्रतिकार करणे.
५. सामाजिक अत्याचारांच्या विरुद्ध संघर्ष करत, जाती आधारित राजकीय चळवळींना योग्य प्रतिसाद देणे.
६. जमातवादाचा कृतिशील प्रतिकार करणे.
७. लैंगिक अन्याय व अत्याचारांच्या विरोधातला संघर्ष तीव्र करणे.
८. विविध प्रकारच्या राष्ट्रवादातील नकारात्मक घटकांना प्रतिकार करणे.

आपण संघर्ष किती तीव्र करतो, वरील कार्ये किती पार पाडतो यावरच देशातील क्रांतिकारी चळवळ पुढे जाईल की नाही हे ठरणार आहे, ठोस परिस्थितीचे ठोस विश्लेषण करायचे काम विविध पक्ष काँग्रेस करतीलच. एक मात्र ध्यानात ठेवायलाच हवे. 'रणनीती नाही आणि फक्त डावपेच' यातून दुरुस्तीवाद जन्माला येतो आणि 'फक्त रणनीती आणि कसलेच डावपेच नाहीत' यातून साहसवाद. आपण या दोन्ही विकृतींपासून सावध राहिले पाहिजे.

विसाव्या पक्ष काँग्रेसच्या वैचारिक ठरावात म्हटले आहे, ''आपल्या जन्मापासूनच माकप या दोन्ही विकृतींच्या विरुद्ध लढत आला आहे. माकपच्या स्थापनेबरोबर हा संघर्ष थांबलेला नाही वा भारतीय क्रांती झाल्यानंतरही तो थांबणार नाही. या बाबतीत किती जागरूक राहिले पाहिजे हे सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपच्या अनुभवाने दाखवून दिले आहे. त्यात आलेल्या अपयशानेच सोव्हिएत युनियनमधील समाजवाद इतका रसातळाला गेला की त्याचा आशय आणि रूप यांचे अनुकरण २१व्या शतकात करणे शक्य नाही.''

अशा परिस्थितीत माकपच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने भारतीय क्रांतीचा आत्मनिष्ठ घटक बळकट करण्यासाठी आपण कटिबद्ध होऊया.

समाजवादाचे भवितव्य काय? या प्रश्नाचे उत्तर आहे: समाजवाद हेच भवितव्य. नाहीतर मानवी संस्कृती घड्याळाचे काटे उलटे फिरवून मध्ययुगीन रानटीपणाकडे जाईल. विसाव्या शतकात रोझा लक्झेंबर्ग यांनी घोषणा दिली होती, 'समाजवाद की रानटीपणा?' तीच घोषणा फिडेल कॅस्ट्रो यांनी नव्याने दिली आहे. मानवतेसमोर हे दोनच पर्याय आहेत. भारतात जनतेची लोकशाही आणि तिच्या पायावर समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी वर्गसंघर्ष तीव्र करत समाजाला रानटीपणात ढकलण्याचे प्रयत्न माकप हाणून पाडेल.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**